# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः26.07.2026** **वारःरविवार**

1. धर्मेंद्र प्रधान यांचा केंद्रीय शिक्षण मंत्रीपदाचा राजीनामा, केंद्रीय मंत्री प्रह्लाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रीपदाचा कार्यभार
2. सरकारशी सकारात्मक चर्चेनंतर सीजेपीचं आंदोलन मागे
3. टीईटी पेपरफुटी प्रकरणातल्या दोन सूत्रधारांना बिहारमधून अटक
4. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीवरून करणार मन की बात
5. राज्यात आषाढी एकादशीचा सण उत्साहात साजरा आणि
6. झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताचा विजय; मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी

**धर्मेंद्र प्रधान-राजीनामा**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आपला राजीनामा सुपूर्द केला. गेल्या दहा दिवसांत विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे आपल्याला दुःख झालं असून, हा आपल्यासाठी प्रतिष्ठेचा प्रश्न नाही, असं प्रधान यांनी समाज माध्यमावरील त्यांच्या संदेशात म्हटलं आहे. तरुण हेच या देशाची खरी ताकद आहेत आणि त्या ताकदीला कुणी संभ्रमित करू नये, हा आपला उद्देश असल्याचं प्रधान यांनी म्हटलं आहे.

जंतर मंतरवरच्या आंदोलनाचा फायदा देशविरोधी घटकांनी घेऊ नये तसंच विद्यार्थ्यांनी आपला वेळ आणि ताकद आपली कारकिर्द घडवण्यासाठी लावावी या उद्देशाने पंतप्रधानांकडे राजीनामा सुपूर्द करत असल्याचं प्रधान यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. नीट परीक्षेच्या संदर्भातली सगळी जबाबदारी पहिल्या दिवसापासून घेतली. पेपर फोडणाऱ्यांमुळं कुठल्याही प्रज्ञावान विद्यार्थ्याची मेहनत वाया जाऊ नये यासाठी अथक प्रयत्न केल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचं मार्गदर्शन, विश्वास आणि पाठिंब्याबद्दल प्रधान यांनी त्यांचे आभार मानले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा केंद्रीय मंत्रिपरिषदेचा राजीनामा स्वीकारला आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडं शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. प्रल्हाद जोशी सध्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण तसंच नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री म्हणून काम पाहत आहेत.

**आंदोलन मागे**

सरकारशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर सीजेपीनं आपलं आंदोलन मागे घेतलं आहे. केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा आणि जितेंद्र सिंह यांनी काल सीजेपीच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. आंदोलकांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही आणि त्यांच्याविरुद्ध कोणताही एफआयआर दाखल केला जाणार नाही, असं नड्डा यांनी सीजेपीच्या शिष्टमंडळासमवेत नवी दिल्लीत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितलं. NEET UG ची प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्याच्या मुद्द्यावरही नियमानुसार जास्तीत जास्त मदत

देण्यासाठी सरकार तयार असल्याचं नड्डा यांनी सांगितलं. सीजेपीचे राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांनी सर्व आंदोलकांना त्वरित आंदोलन मागं घेण्याचं आणि शांततेने आपापल्या घरी परतण्याचं आवाहन केलं.

**TET पेपरफुटी**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजे टी. ई. टी. पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार बिजेंद्र कुमार गुप्ता आणि इंद्रजीत विनयकुमार सिंग यांना बिहार मधील समस्तीपूर इथून अटक केल्याची माहिती भिवंडीचे पोलिस उपायुक्त पवन बनसोड यांनी दिली आहे. भिवंडी न्यायालयानं त्यांना 30 जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहेत. या प्रकरणात या आधी 12 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी अकरा वाजता आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमाद्वारे देश-परदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 136 वा भाग असेल. आकाशवाणी, दूरदर्शन नेटवर्क, ए. आय. आर. न्यूज वेबसाइट आणि न्यूज ऑन एआयआर मोबाइल ॲपवर देखील हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. हिंदीतल्या प्रसारणानंतर हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्येही प्रसारित केला जाईल.

**कारगिल विजय दिवस**

27 वा कारगिल विजय दिवस आज देशभरात साजरा होत आहे. या निमित्त काल द्रास इथं कारगिल युद्ध स्मारकावर 'शौर्य संध्या' हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह संरक्षण दलांचे आणि प्रशासनाचे अधिकारी, माजी सैनिक, 'वीर पत्नी', हुतात्मा जवानांचे कुटुंबीय या कार्यक्रमाला उपस्थित होते. आज कारगिल युद्ध स्मारकावर हुतात्मा जवानांना श्रद्धांजली अर्पण केली जाणार आहे.

**नांदेड-पीकपाणी**

नांदेड जिल्ह्यात गेल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळं शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**नांदेड जिल्ह्यात 95 टक्के खरीपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. जुलैअखेरीस हा आकडा 100 टक्के जाईल अशी माहिती जिल्हा कृषी विभागाने दिली आहे.जिल्ह्यात 4 लाख 54 हजार हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पिकाची पेरणी झाली आहे. त्या खालोखाल कापसाची पेरणी झाली आहे. अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद ही कडधान्य हाती येतील की नाही अशी शंका शेतकरी व्यक्त करत आहेत. नांदेड जिल्ह्यात जुलै अखेरपर्यंत एकूण सरासरीच्या 26 टक्के पाऊस झाला आहे. लांबलेल्या पावसामुळे शेतकरी चिंतातूर आहे. पिके तरली असली तरीही जलसाठे मात्र अद्यापही तळालाच आहेत. ही परिस्थिती पाहता प्रशासकीय स्तरावर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे आदेश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत. आतापासूनच पाणीटंचाईच्या उपाययोजना हाती घेतल्या नाहीत तर आगामी काळात नांदेड जिल्ह्यात भीषण परिस्थिती उद्भवू शकते हे मात्र निश्चित. आकाशवाणीसाठी, अनुराग पोवळे, नांदेड.**

**आषाढी एकादशी**

आषाढी एकादशीचा सण काल राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा झाला. विठूरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये लाखो भाविकांनी गर्दी केली होती. राज्यभरातल्या विविध विठ्ठल मंदिरांमध्येही काल दिवसभर भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. पुण्यात निवडुंग्या विठोबा, तसंच

विठ्ठलवाडी इथल्या विठ्ठल मंदिरात, मुंबईत वडाळा इथल्या विठ्ठल मंदिरात तर अहिल्यानगर जिल्ह्यामधील पारनेर तालुक्यातील पळशी इथल्या विठ्ठलाच्या पुरातन मंदिरात भाविकांनी दर्शन घेण्यासाठी रांगा लावल्या.

बीड, भंडारा आणि सांगलीत शालेय विद्यार्थ्यांनी विठूनामाच्या गजरात दिंडी काढली. रत्नागिरी शहरात एक घर-एक तुळस या संकल्पनेवर आधारित उपक्रमांतर्गत भाविकांना तुळशीच्या 350 रोपांचं वाटप करण्यात आलं. यवतमाळ मध्ये शिवसेनेकडून कामगार बांधवांसाठी उभारण्यात आलेल्या "कामगार सुरक्षा निवारा"या लोकोपयोगी उपक्रमाचं काल लोकार्पण करण्यात आलं.

शेगाव इथं श्री संत गजानन महाराज समाधी मंदिरात काल राज्यसह शेजारच्या राज्यातूनही हजारो वारकरी आणि भाविक दाखल झाले होते. हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर इथले प्रसिद्ध चित्रकार आणि कलाशिक्षक दिलीप दारवेकर यांचं 'माझी चित्रवारी' हे चित्र प्रदर्शन भरवण्यात आलं होतं.

**<u>विक्रम-नागपूर</u>**

नागपूर मधील इयत्ता चौथीतील विद्यार्थी युगांत वंजारी यानं वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी एकाग्रता, स्मरणशक्ती आणि कौशल्याच्या जोरावर जागतिक स्तरावर एक विक्रम केला आहे. डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या अवस्थेत पाच वेगवेगळ्या रंगांच्या 60 गोट्या युगांतनं अवघ्या 48 सेकंदांत रंगानुसार पाच स्वतंत्र पात्रांमध्ये अचूकपणे ठेवत हा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. इंडियन वर्ल्ड रेकॉर्ड फेडरेशन एलएलपीनं युगांतला जागतिक विक्रमाचं प्रमाणपत्र प्रदान केलं त्याचबरोबर 'वंडर किड्स ऑफ द वर्ल्ड'या चषकानं त्याचा सन्मान करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते युगांतचा विशेष सत्कार करण्यात आला.

**<u>भूकंप</u>**

नाशिक जिल्ह्यात सुरगाणा तालुक्यात बोरगाव इथं काल भूकंपाचे चार धक्के जाणवले. हिंगोली जिल्हयामध्येही काल संध्याकाळी भूकंपाचा सौम्य धक्का बसला. दोन्ही ठिकाणी कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाल्याचं वृत्त नाही.

**<u>क्रिकेट</u>**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, हरारे इथं झालेल्या दुसऱ्या टी-20 क्रिकेट सामन्यात भारतानं यजमान झिम्बाब्वेचा 90 धावांनी पराभव करून तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित 20 षटकांत 5 बाद 219 धावा केल्या. ईशान किशननं 44 चेंडूंत 81 धावां तर तिलक वर्मानं 29 चेंडूंत नाबाद 60 धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या आव्हानाचा पाठलाग करताना, झिम्बाब्वेचा संघ 18 व्या षटकापर्यंत 129 धावांच करू शकला. भारतीय टी-20 संघाचा नवीन कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील हा पहिलाच मालिका विजय आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी काल मध्यम ते जोरदार पाऊस पडला. मराठवाड्यात अद्याप पावसाचा जोर कमी आहे. आज कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी तर विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**